# २०२० सालातीलही काही आनंदाचे क्षण

**अलका मुळे –** (फ्रीमॉण्ट, कॅलिफोर्निया)



२०२० हे वर्ष सुरू झाले पण नव्या वर्षाचा आनंद उपभोगण्यापूर्वीच सगळीकडे हाहा:कार माजला. चीनमधून रोगाची नवीनच साथ आली आणि सर्व जगात Pandemic सुरू झाले. आतापर्यंत पुष्कळ साथी आल्या; पण जग व्यापेल अशा नव्हत्या. अमेरिकेत मार्च महिन्यांपासून सर्वत्र शाळा, विद्यापीठे, कार्यालये बंद करण्यात आली. सर्व सार्वजनिक कार्यक्रमांवर बंदी आणली आणि सर्वजण घरातून कामे करू लागले. कुठेही जाणे -येणे - भेटणे बंद झाले. सण आणि राष्ट्रीय सुट्यांच्या दिवशी लोक एकमेकांना भेटण्याची शक्यता असल्याने नियम अधिकच कडक केले गेले. हिवाळ्यात थोडी कमी झालेली साथ परत उसळेल अशी शक्यता होती. अमेरिकेत ३००,००० हून जास्त लोक मृत्युमुखी पडले होते, एकीकडे शास्त्रज्ञ लस शोधण्याचा प्रयत्न करत होते.

दहा महिन्यापूर्वी जानेवारी महिन्यात आम्ही भारतातून चीनमार्गे अमेरिकेत आमच्या घरी परतलो. पुढे हे असे काही होईल असं तेव्हा वाटलेच नाही. आम्ही घरी पोहचलो त्याच दिवशी चीनमधून विमान वाहतूक बंद झाली. पुढे सगळीकडे हळूहळू वाहतूक आणि विमानतळे बंद होऊ लागली. परमेश्वर कृपेने आम्ही अमेरिकेत सुखरूप येऊन पोहचलो. पण मग पुढचे दहा महिने घरातच अडकून पडलो. वयस्क लोकांसाठी तर हा रोग भयानकच आणि शिवाय कुटुंबात इतरांची ही काळजी वाटत होती.

सप्टेंबरमध्ये गणपती स्थापनेला फ्रिमॉण्टहून मुलीकडे अरवाईनला जाता आले. थोडा बदल मिळाला. वातावरण आणि हवामान बदलले. सर्वांच्या घरचे गणपती दर्शन झूम वरून घेतले. आरतीचा कार्यक्रम पण झूम वरूनच झाला. त्यानिमित्ताने सर्वांच्या व्हर्च्युअल भेटी-गाठी झाल्या. सर्वजण उत्साहित झाले.

एक दीडमहिन्यांनी परत घरी फ्रिमॉण्टला जाऊं असे ठरवले होते पण जावयाचा (संजयचा) पन्नासावा वाढदिवस नोव्हेंबरमध्ये होता. मुलगी अर्चना हिने काहीतरी खास करायचं असं ठरवले होते. हळूहळू अर्चनाने सरप्राइज वाढदिवसाची तयारी सुरू केली. दोन-तीन मित्रांनी खूप सहकार्य केले. वेगवेगळे गेम्स, व्हेन्यू ठरविण्यात मदत केली. पूर्ण कार्यक्रमाची आखणी करणे व संजयला काही कळू न देण्याची काळजी सर्वजण घेत होते. १० नोव्हेंबर २०२० ला थाटात वाढदिवस साजरा झाला. सकाळी ७ वाजल्यापासूनच भारतातील नातलग, संजयची आई, भाऊ यांच्याबरोबर झूम मीटिंग झाली. लहानपणच्या, मोठेपणच्या कॉलेजच्या सगळ्या आठवणींची उजळणी झाली. दुसरी मीटिंग १० वाजता भारतातील मित्रांबरोबर झाली. सर्वांना प्रत्यक्ष भेटण्याचा आनंद लाभला. आपापल्या भावना दूर राहूनही व्यक्त करता आल्या. आजच्या युगात झूम मुळेच हे शक्य झाले. दुपारच्या जेवणाला श्रीखंड पुरीचा बेत होता. परत संध्याकाळी स्थानिक मित्राबरोबर झूम मीटिंग झाली. त्यात उत्साही नाटक मंडळातील मित्रांनी नाटकातील निवडक उतारे आणि दृश्ये सादर केली. रात्री दोन-तीन कुटुंबाबरोबर सोशल डिस्टन्स पाळून पावभाजी, पुलाव, गोड -धोड असा कार्यक्रम उत्साहात पार पडला. दिवस आनंदात सरला. गेल्या ११ महिन्यात असा आनंद-उत्सव साजरा झालाच नव्हता.

१४ नोव्हेंबरला शनिवार होता. आमची थोरली मुलगी, मुलगा आणि सूनेसह कुटुंब अरवाईनला आले. आदल्या दिवशी अर्चना-संजयची मुलगी अटलांटाहून वडलांच्या वाढदिवसासाठी आली होती. रोजच "बर्थडे बॉयला" आश्चर्याचे धक्के बसत होते. आता आणखी आश्चर्य म्हणजे ११ वाजतां एक लिमो आली. आम्ही सर्व लिमोने जवळच्या एका रिसॉर्टवर गेलो. एक-दीड तासाची राईड होती. आमच्या

पैकी काही जण लिमोत प्रथमच बसत होते. रिसॉर्ट खूप मोकळा होता. एका धबधब्याजवळ मोठा ओपन व्हरांडा होता. एका टेबलापाशी एक कुटुंब असे सहा फूट अंतर ठेवून बसण्याची सोय केली होती. सुंदर सेंटर पीस आणि फुलांनी टेबल छान सजवले होते. काही मित्रांनी निरनिराळे गेम्स आयोजित केले होते. संजयच्या आवडीचे विषय घेऊन त्यावर प्रश्नोत्तरी होती. संजयला स्वयंपाक करायला आवडतो म्हणून पाककलेविषयी प्रश्नांचाही समावेश होता. बॉलीवूडवरील प्रश्नांना तीन-चार मंडळी पटापट उत्तरें देत होती. एक पाहुणी तर बॉलिवूडची encyclopedia च ठरली. मराठी मंडळी क्रिकेटप्रेमी तर असतातच. जेवण पण भारतीय होते. रिसॉर्टच्या कुकला भारतीय जेवण करण्याची सवय नव्हती; कारण तिथे भारतीय जेवण सहसा देत नाहीत. पण संजयच्या एका मित्राच्या मदतीने त्याने आपले जेवण बनवले. विषेशतः मराठी शाकाहारी पदार्थ आणि गोड-धोड चांगले केले होते. नेहमीच आठवण राहील असा कार्यक्रम झाला. प्रसन्न हवा, प्रसन्न वातावरण, प्रसन्न व्यक्तिमत्व त्यामुळे उत्साहाला उधाण आले होते.

सर्व कार्यक्रम संपवून, सर्वांना बाय करून आम्ही चार वाजता घरी परत आलो. दुसऱ्या दिवशी रविवारी आम्ही फ्रीमॉण्टवासी आनंदाने परतीच्या वाटेला निघालो. हा वाढदिवस नेहमीच स्मृतीत राहील. लवकरच ही रोगाची साथ जावो आणि पूर्वीसारखे जीवनमान सुरू होवो ही सदिच्छा!

सर्वांना लस मिळाली की मग अर्चना- संजयच्या २५व्या लग्नाच्या वर्षदिनाची आम्ही वाट बघतोय.

***